| CNR No. MHYA110000211991 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | ३० | ०७ | १९९१ |
| | नोंदणी दिनांक | ३० | ०७ | १९९१ |
| | निकाल दिनांक | ०६ | ०४ | २०२६ |
| | **कालावधी** | **वर्षे** | **महीने** | **दिवस** |
| | | **३४** | **०८** | **०७** |

**भाग 'अ'**

| | | | |
|---|---|---|---|
| | **उमरखेड येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन न्यायाधीश एस.जी.ठाणेदार) | | |
| | **नि.फौ.ख.क्र. १२१/१९९१** | | **नि.क्र.५८** |
| | **गुन्हा नोंद क्रमांक १०७/१९९० ,**<br>भा.दं.वि.कलम ४०९ अन्वये | | **पोलीस ठाणे बिटरगांव** |
| **अभियोग पक्ष** | :- | शासन तर्फे पो.स्टे.बिटरगांव, जि.यवतमाळ | |
| **विधिज्ञ** | :- | विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस.गोरे | |
| **आरोपी** | :- | आप्पराव रामजी जंगले,<br>वयः ३५ वर्ष, कामधंदा– सचिव जंगल कामगार स.संस्था चिखली, रा.पिंपळगांव इजारा, ता. महागांव जि. यवतमाळ | |
| **विधिज्ञ** | :- | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९प्रमाणे संपरीक्षा | |
| **दोषारोपः-** भारतीय दंड संहितेचे कलम ४०९ अन्वये. | | | |

**भाग 'ब'**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०१.१०.१९८६ ते ३०.०९.१९८८ चे दरम्यान |
| गुन्हयाची पहीली खबर दाखल दिनांक | :- | २९.१२.१९९० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | ३०.०७.१९९१ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २९९ प्रमाणे |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | :- | १८.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | :- | ०६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | :- | ०६.०४.२०२६ |
| आरोपी दोषी आढळल्यास,शिक्षा ठोठावल्याचा दिनांक | :- | **दोषमुक्त** |

**आरोपीचा तपशिल :-**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमानत दिनांक | दोषारोप | निर्दोष/ दोषी | शिक्षा | स्थानबध्दता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आप्पाराव रामजी जंगले | ०७.०७.१९९१ | -- | भा.दं.वि. कलम ४०९ अन्वये | दोषमुक्त | नाही. | नाही. |

## न्यायनिर्णय

( दिनांक ०६.०४.२०२६ )

आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४०९ अन्वये संपरीक्षा चालविण्यात आली.

**०२. अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे कीः–**

फिर्यादी प्रकाश शंकरराव चौधरी लेख परीक्षक श्रेणी–२ सहकारी संस्था जंगल कामगार यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन बिटरगांव येथे फिर्याद दिली की, फिर्यादीला वरील संस्थेचे अफरातफरी संबंधीचा गुन्हा दाखल करण्यासंबंधी जिल्हा विशेष लेखा परीक्षक सहकारी संस्था यवतमाळ यांनी आदेश दिला. सदर संस्थेचे सचिव जंगले यांना सोनबा शेळके यांनी चार्ज दिल्यानंतर आरोपी जंगले हा आर्थिक सर्व व्यवहार सचिव म्हणुन पाहत होता. आरोपीने चार्ज घेतल्यानंतर दहा वीस रुपयाच्या खर्चीक पावत्या व ३१ रुपये ९० पैसे नगदी दिले. त्यानंतर भावराव पिवळे हा अध्यक्ष होता तसेच शिवाजी शेळके हा लिपीक म्हणुन कार्यरत होता. डेपु लिपीक मारोतराव

नरपते हा होता. आरोपी आप्पाराव जंगले यांनी कॅशबुक वरील पान क्रमांक १६ वर अफरातफर केली. त्यावर त्याची सही आहे. तसेच आरोपीने इतर पावत्या नोंदवह्या व तारखेमध्ये अफरातफर करुन घोळ केलेला आहे. सदर पावत्यावर आरोपी आप्पाराव याच्या सहया आहेत. सबब संस्थेचा संपुर्ण अभिलेख जप्त करण्यात आला आहे. करीता फिर्याद दाखल केली.

**०३.** फिर्यादीच्या तक्रारीच्या आधारे आरोपी विरुध्द गुन्हा नोंद क्र. १०७/१९९० अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ४०९ सह ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तपासिक अधिकारी यांच्याकडे देण्यात आला त्यांनी सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप–पत्र दाखल केले.

**०४.** आरोपी फरार असल्यामुळे त्याच्या विरुध्दात कलम २९९ फौजदारी प्रक्रिया संहिताप्रमाणे संपरीक्षा चालविण्यात आली व साक्षीदार तपासण्यात आले.

**०५.** अभियोग पक्षाने एकुण तीन साक्षीदार तपासला आहे. अभियोगपक्षास वारंवार संधी देवुनही इतर साक्षदारांना साक्षकामी न्यायालयात हजर केले नाही. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०६.** सहायक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एस.गोरे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे खटल्याच्या निर्णयासाठी विचारार्थ घेतले आहेत. विषद केलेल्या कारणमिमांसा अन्वये मुद्याचे निष्कर्ष नमूद करण्यात आले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, आरोपी क्र. १ आप्पाराव जंगले याने संस्थेचा सचिव म्हणुन कार्यरत असतांना | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | संस्थेचे कॅशबुक व आर्थिक व्यव्हारामध्ये पावत्याची अफरातफर करुन कॅशबुकवर रकमेची अफरातफर केली आहे आणि त्या अन्वये भा.द.वि कलम ४०९ अंतर्गत गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | |
| ०२. | काय आदेश? | दोषमुक्त |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. ०१ व ०२ करीता :–**

**०७.** सर्व प्रथम मी याठिकाणी सांगु इच्छीतो की, प्रस्तुत प्रकरणात माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे आरोपीच्या गैरहजरीत संपरीक्षा चालविली व या न्यायालयाने तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. प्रस्तुत प्रकरणात दिर्घकाळ अभियोग पक्ष कोणतेही साक्षीदार तपासु शकले नाही. प्रकरणाचे वय पाहता या न्यायालयाने अभियोग पक्षाचा बंद केला.

०८. पुराव्याचे विश्लेषण करण्यापुर्वी सर्वप्रमथम मी येथे सांगु इच्छीतो की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी प्रकाश चौधरी लेखा परीक्षक सहकारी संस्था जंगल कामगार यवतमाळ यांना वेळोवेळी संधी देवुन सुध्दा साक्षीसाठी हजर ठेवले नाही. करीता प्रकरण जुने असल्यामुळे या न्यायालयाने दुसऱ्या साक्षीदारांना साक्षी समंस काढुन एकुण तीन साक्षीदारांची साक्ष या प्रकरणात नोंदविली आहे.

०९. **सा.क्र. ०१ मोतीराम दुपसिंग चव्हाण**, हा सदर प्रकरणातील पंच साक्षीदार असुन त्याने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, त्याचे समक्ष पोलीसांनी कोणत्याही प्रकारचा जप्ती पंचनामा केला नाही. सदर साक्षीदाराने पोलीसांनी केवळ

त्याची सही घेतल्याचे मान्य केले आहे. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला फितुर घोषित करुन त्याला सुचक प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांना नकार दिला.

**१०. सा.क्र. ०२ सोनबा शेळके**, याच्या साक्षीत असे आले आहे की, आरोपी काही दिवस संस्थेवर सचिव म्हणुन कार्यरत होता. घटनेविषयी त्याला काही माहीती नाही. पोलीसांनी त्याचे बयाण घेतले नव्हते. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला फितुर घोषित करुन त्याला सुचक प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांना नकार दिला.

**११. सा. क्र. ०३ शिवाजी महादेव शेळके**, याच्या साक्षीत असे आले आहे की, त्याला घटनेविषयी काहीही माहीती नाही. एकंदरीत तपासलेल्या तिन्ही साक्षीदारांनी आरोपी विरुध्द साक्ष दिलेली नाही. साक्षीदाराने अशी साक्ष दिली आहे. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने सर्व प्रश्नांना नकार दिला आहे.

**१२.** अभियोग पक्षाला प्रामुख्याने कलम ४०९ भा.द.वि अन्वये दोष सिध्द करण्याकरीता सर्वप्रथम आरोपी हा फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे जंगल कामगार सहकारी संस्था येथे सचिव म्हणुन कार्यरत असतांना सदर संस्थेचे कॅशबुक व पैश्यांची अफरातफर केली ही बाब सिध्द करणे अत्यंत महत्वाचे ठरते. दुर्दैवाने अभियोग पक्षाने लेखा परिक्षक तथा फिर्यादी यास तपासलेले नाही. घडलेली सर्व प्रकार व अफरातफर विशेष फिर्यादीच्याच ज्ञानात होती म्हणुन कलम १०६ प्रमाणे सदर संपुर्ण बाबी फिर्यादी न्यायालयात येवुन सांगणे अपेक्षित होते. प्रस्तुत प्रकरणतात संस्थेचे कर्मचारी यांनी सुध्दा अभियोग पक्षाला समर्थन दर्शविलेले नाही. प्रामुख्याने सांगायचे म्हणजे आरोपी आप्पाराव जंगले संस्थेचा सचिव होता ही बाब स्पष्टपणे अभिलेखावर आलेली नाही. त्याचे प्रमाणे कशाप्रकारे अफरातफर झाली ही बाब सुध्दा स्वतंत्र साक्षीदाराने किंवा इतर

साक्षीदाराने सांगितलेली नाही. वरील सर्व मुद्दांची चर्चा अंती आरोपी सदर संस्थेतील रकमेची अफरातफर केली ही बाब सिध्द होवु शकली नाही.

**१३.** या प्रकरणातील सा.क्र. १ व २ यांनी त्यांच्या पंचनाम्यावरील सह्या मान्य केल्या आहेत. एखाद्या प्रकरणातील जपती पंचनामा सिध्द जरी झाला तर गुन्हयातील महत्वाचे घटक सिध्द होत नाहीत. त्यासाठी अभियोग पक्षाला संशयाच्या पलिकडे जावुन स्वतंत्र साक्षीदारांच्या साक्षीवर गुन्हयाचे घटक सिध्द करणे क्रमप्राप्त असते. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने प्रस्तुत संस्थेतील पैशाची अफरातफर केली ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. सदर बाब भारतीय पुरावा कायदा **कलम १०६** प्रमाणे फिर्यादी व तपासीक अधिकारी यांच्या विशेष ज्ञानात होती, परंतु त्यांना तपासण्यात आलेले नाही. अभियोग पक्षाने एकही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. दोषारोपाचे अवलोकन केले असता आरोपीने सदरचे सदर पैशाची अफरातफर कशाप्रकरे केली ही बाब सुध्दा कुठेच नमुद नाही.

**१४.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द कोणताही बळकटी व दुजोरा देणारा संयुक्तिक व सबळ असा पुरावा अभिलेखावर आणला नसल्याने आरोपी संशयाचा फायदा देवुन दोषमुक्त करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल कॅशबुक व पावत्या संस्थेच्या अभिलेखाचा भाग असुन भविष्यात महत्वाचा पुरावा म्हणुन उपयोगी ठरु शकतो. सबब कागदोपत्री स्वरुपात जप्त असलेला मुद्देमाल महत्वाचे असल्यामुळे पोलीसांनी सदर जप्तमुद्देमाल फिर्यादीला अपील कालावधीनंतर परत करावा. एकंदरीत मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ करीता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. आरोपी आप्पाराव रामजी जंगले, यास कलम ४०९ या गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

०३. सबब कागदोपत्री स्वरुपात जप्त असलेला मुद्देमाल महत्वाचे असल्यामुळे पोलीसांनी सदर जप्तमुद्देमाल फिर्यादीला अपील कालावधीनंतर परत करावा.

०४. आरोपी फरार असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन आदेश पारीत करण्यात आले नाही.

(निकाल खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
THANEDAR
SHAHABUDDIN
GHOUSEMOHIUDDIN
2026.04.06 15:09:31
+0530

उमरखेड
दिनांकः ०६/०४/२०२६

(**एस.जी.ठाणेदार**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरखेड

## भाग 'क'

अभियोग पक्षाने/बचाव पक्षाने/ न्यायालयाने नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी:-

**अ) अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | मोतीराम दुपसिंग चव्हाण | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | सोनबा नागाजी शेळके | साक्षीदार |
| सा.क्र.३ | शिवाजी महादु शेळके | साक्षीदार |

**ब) आरोपी पक्षाचे साक्षीदार.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) न्यायालयाचे साक्षीदार.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोग पक्षाने/ बचाव पक्षाने/ न्यायालयाने सादर केलेले निशाणी यादी :-**

**अ) अभियोग पक्ष :-**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२५/सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |

**ब) बचाव पक्ष:-**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) न्यायालय :-**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**सादर केलेला मुद्देमाल/वस्तु :-**

| अनु.क्र. | मुद्देमाल/वस्तु | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

THANEDAR SHAHABUDDIN GHOUSEMOHIUDDIN
2026.04.06 15:09:37 +0530

उमरखेड (**एस.जी.ठाणेदार**)
दिनांकः ०६/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,उमरखेड

<u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ.फाईलमध्ये मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख : ०६.०४.२०२६

न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख : ०६.०४.२०२६

लघुलेखकाचे नाव बी.जी.सावते (ग्रेड - III)

न्यायनिर्णय अपलोड करण्याची तारीख : ०६.०४.२०२६